# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – १३ मार्च २०१६

## उच्च शिक्षणात विद्यापीठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका महत्वाची
### राज्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी फोरमतर्फे एक लाखाची देणगी

मुंबई – उच्च शिक्षणात विद्यापीठ प्रशासकिय अधिकाऱ्यांची भूमिका ही महत्वाची असून शासनाचे अनेक ध्येय धोरण आणि योजनांची अमलबजावणी करण्याची मोठी भूमिका ही विद्यापीठ प्रशासकिय अधिका-यांची असते. प्रशासनामार्फत विद्यार्थी केंद्रीत प्रशासन अपेक्षित असून विद्यार्थी हिताचे रक्षण करण्याचीही मोठी जबाबदारी प्रशासकिय अधिका-यांची असल्याचे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी केले. ते आज महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ऑफिसर्स फोरम आणि मुंबई युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेलफेअर असोसीएशन यांच्या सयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या उच्च शिक्षणावर एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदे मध्ये बोलत होते. नियमानुसार विद्यापीठ अधिकाऱ्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जाणार असून सकारात्मक पध्दतीने त्यांचे प्रश्न मार्गी लावले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. परिषदेचे उदघाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते दीक्षान्त सभागृहात करण्यात आले. या राज्यस्तरीय परिषदेमध्ये महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ऑफिसर्स फोरमतर्फे राज्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी रुपये १ लाखाचा धनादेश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला.या परिषदेला आ.निरंजन डावखरे यांच्यासह मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख, डॉ.विलास गायकर,कुलगुरू,डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ,लोणेरे, डॉ. वेंकटेशकुमार, टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स , सिध्दार्थ खरात ,उपसचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय यांची उपस्थिती लाभली होती.

उच्च शिक्षणावरील या एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेमध्ये तीन विविध सत्रामध्ये व्याख्याने आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) : धोरण,दिशा,अडथळे व उपाय' यावर डॉ. वेंकटेशकुमार, टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स , यांचे बीजभाषण झाले. तर 'उच्च शिक्षणापुढील आव्हाने / संधी' यावर डॉ.विलास गायकर,कुलगुरू,डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ,लोणेरे, हे मार्गदर्शन केले. तसेच 'उच्च शिक्षणातील सध्याची परिस्थीती व विद्यापीठ अधिकाऱ्यांची भूमिका ' यावर सिध्दार्थ खरात ,उपसचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय यांनी उपस्थित अधिका-यांना मार्गदर्शन केले . तर तिसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठ प्रशासनाशी निगडीत विविध विषयांवर अधिकाऱ्यांमध्ये संवाद व चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ऑफिसर्स फोरमचे अध्यक्ष पुरण मेश्राम यांनी फोरमची भूमिका स्पष्ट करुन प्रशासकिय अधिका-यांच्या न्याय मागण्या सोडवण्यासाठी फोरम कटीबध्द असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण फोरमचे महासचिव डॉ. दिनेश कांबळे यांनी केले.या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.ए.खान,बीसीयुडी संचालक डॉ.अनिल पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशने / सांख्यिकी )